द्वंद्वाची उत्तरे मिळतात तेच खरे प्रभावी साहित्य : डॉ. नीलम गोऱ्हे >> पान 2

स्वच्छतेचा प्रश्न व वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी तात्काळ नियोजन करा >> पान 3

अनधिकृत लेआउट प्रशासनाच्या रडारवर >> पान 4

**सुविचार**

जीवनात सामंजस्य वाढवा.



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 302 ■ सोमवार, दि. 14 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


प्रेम मिळवण्यासाठी सिद्धांत-तृप्तीनं युद्ध पुकारले, धडक २चा ट्रेलर झाला रिलीज

आतील पान

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क विभागातील वरिष्ठ सहाय्यक संचालक आणि



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जनसंपर्क अधिकारी संजय देशमुख (वय ५५ वर्षे) यांचे शनिवारी (दि.१२) हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने पत्रकारिता आणि शासकीय जनसंपर्क क्षेत्रातील शांत, संयमी, संवेदनशील आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व हरपले आहे.

संजय देशमुख हे गेल्या दहा वर्षाहून अधिक काळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होते. आपल्या संयमित आणि प्रभावी कामकाजामुळे त्यांनी प्रशासन व प्रसारमाध्यमांमध्ये दुवा म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली.

पत्रकारितेतील कारकिर्दीची सुरुवात त्यांनी मुंबई दिनांक आणि दैनिक सकाळ या माध्यम समूहातून केली होती. माध्यमांतील अनुभवामुळेच त्यांच्या शासकीय जनसंपर्क कार्यात व्यावसायिकता आणि सुसूत्रता होती.

त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी व मुलगी असा परिवार आहे. सोमवार दि १४ रोजी दादर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# राष्ट्रपतींनी राज्यसभेसाठी वकील उज्ज्वल निकम यांच्यासह चार सदस्यांची नामांकने जाहीर केली!

**नवी दिल्ली:** भारताचे राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मू यांनी माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला, २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम, केरळचे शिक्षक आणि भाजप नेते सी. सदानंदन मास्टर तसेच इतिहासकार मीनाक्षी जैन यांना राज्यसभेसाठी शनिवार, दि.१२ जुलै रोजी जारी केलेल्या राजपत्रात या नियुक्त्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे.

राज्यसभेतील नामांकित सदस्यांच्या निवृत्तीमुळे रिक्त जागा भरण्यासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. राज्यसभेत राष्ट्रपती कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा आणि इतर क्षेत्रांतील एकूण १२ व्यक्तींना राष्ट्रपती नामांकित करू शकतात. सध्या त्यातील चार जागा रिक्त होत्या.



हर्षवर्धन श्रृंगला हे माजी परराष्ट्र सचिव असून त्यांनी अमेरिका, बांगलादेश आणि थायलंडमध्ये भारताचे राजदूत म्हणूनही काम पाहिले आहे. २०२३ मध्ये भारताच्या जी-२० अध्यक्षपदाच्या वेळी ते मुख्य समन्वयक होते.

कायदेक्षेत्रातील एक प्रसिद्ध व्यक्ती उज्ज्वल निकम यांनी २६/११ मुंबई हल्ल्याच्या खटल्यात सरकारी वकील म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ते मुंबई उत्तर-मध्य मतदारसंघातून भाजपचे उमेदवार होते.

सी. सदानंदन मास्टर हे केरळमधील भाजप नेते असून १९९४ मध्ये सीपीआय (एम) च्या संशयास्पदी हल्ल्यात त्यांनी दोन्ही पाय गमावले होते. यानंतर त्यांनी आपले शिक्षण क्षेत्रातील कार्य सुरूच ठेवले. त्यांना पक्षाकडून 'जिवंत शहीद' अशी पदवी देण्यात आली आहे.केरळ विधानसभा निवडणुकीत कुथुपरम्बू मतदारसंघातून भाजप उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती. सी. सदानंदन यांनी राष्ट्रीय शिक्षक संघाचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते आणि ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या थिंक टँक, भारतीय विचार केंद्रमचे सक्रिय सदस्य आहेत.

इतिहासकार मीनाक्षी जैन या दिल्ली विद्यापीठाच्या गार्गी महाविद्यालयात इतिहासाच्या माजी प्राध्यापिका आहेत. त्या ऐतिहासिक संशोधनासाठी ओळखल्या जातात. त्यांनी 'मध्ययुगीन भारत' या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकाचे लेखन त्यांनी केले आहे. त्यांची अलीकडील पुस्तक, ''राम आणि अयोध्या'', हे अयोध्या रामजन्मभुमीवरचे एक महत्त्वाचे पुस्तक म्हणुन गिनल्या जात आहे. त्या टाइम्स ऑफ इंडियाचे माजी संपादक गिरीलाल जैन यांची कन्या आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वर शुभेच्छा देताना चौघांच्या कार्याचा गौरव केला आणि त्यांच्या संसदीय कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## बाथरुमला जायचंय सांगून पळाला, पोलिसांनी दोन तासांत बडनेऱ्यातून बेड्या ठोकल्या

**अमरावती/प्रतिनिधी :** शहरात बॉम्ब असल्याचे तीनदा फेक कॉल करणाऱ्या आरोपीने पोलिसांच्या नाकात दम आणला. सिटी कोतवाली पोलीस स्टेशनच्या लॉकअपमध्ये असलेल्या या आरोपीला चौकशीसाठी बाहेर काढण्यात आले होते. शौचाला जाण्याची विनंती केल्यानंतर पोलिसांनी त्याला शौचालयासाठी बाहेर नेले. याच संधीचा फायदा घेत आरोपीने भिंतीवरून उडी घेत थेट पोबारा केला. ही घटना काही क्षणातच पोलिसांत खळबळ उडवणारी ठरली. आरोपीने पोबारा करताच शहर पोलिस प्रशासन हादरले आणि तातडीने शोध मोहीम सुरू करण्यात आली. शहरातील प्रमुख ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली तसेच सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात आला. केवळ दोन तासांच्या आत पोलीस दलाने अत्यंत तत्परतेने काम करत आरोपीला बडनेरा परिसरातून अटक केली. सध्या आरोपीविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्या

## तिजोरीतील खडखडाटामुळे ५० वर्षानंतर सरकारन घेतला महत्त्वाचा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सुमारे ५० वर्षापासून वाईन शॉपच्या परवान्यांसाठी असलेली स्थगिती उठविली जाणार आहे. राज्यात नवीन ३२८ वाईन शॉपकरिता मद्यविक्रीचे परवाने दिले जाणार आहेत. यातून राज्याच्या तिजोरीत मोठा निधी येईल, अशी राज्य सरकारला अपेक्षा आहे.

महसूल वाढविण्यासाठी सरकारचा प्रयत्न-महायुतीनं विधानसभा निवडणुकीपूर्वी अनेक योजना जाहीर केल्या होत्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना तसेच अन्य काही मोफत योजनामुळं राज्याचा तिजोरीला मोठा फटका बसला आहे. लाडक्या बहिणींसाठी लागणाऱ्या निधीसाठी अन्य विभागातील निधी या योजनेत वळविला जात आहे. तसेच राज्यावर ९ लाख कोटीपेक्षा अधिक कर्ज असताना अनेक योजनामुळं राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे. अशा परिस्थितीत महसूल वाढविण्यासाठी राज्यात नव्यानं ३२८ वाईन शॉपकरिता परवाने दिले जाणार आहेत.प्रत्येक वर्षी १४ हजार कोटी रुपयांची भर-दुसरीकडे महसूल वाढविण्यासाठी देशी मद्य, विदेशी मद्य तसेच मद्याच्या प्रीमियम ब्रॅण्डच्या दरात साधारण ९ ते ७० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय गेल्या मंगळवारच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. याव्यतिरिक्त मद्यविक्रीसाठी दिल्या जाणाऱ्या परवान्याच्या शुल्कातही वाढ करण्यात आली आहे.

या विविध निर्णयामुळे राज्य सरकारच्या महसुलात प्रत्येक वर्षी १४ हजार कोटी रुपयांची भर पडण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. परवाना देण्यावरून मंत्रिमंडळात वाद- राज्यात तिजोरीत महसूल वाढविण्यासाठी नव्यानं ३२८ वाईन शॉपना परवाने दिले जाणार असल्याची माहिती राज्य उत्पादनशुल्क मंत्री तथा अर्थमंत्री अजित पवारांनी दिली आहे. तसेच मद्य विक्रीसाठीही परवाने दिले जाणार आहेत. याचाच एक भाग म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागांमध्ये विदेशी मद्यनिर्मिती कंपन्यांना परवाना देण्यात येणार आहे. यासाठी उपमुख्यमंत्री आणि राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवारांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलीय. गेल्या सरकारमध्ये राज्य उत्पादन शुल्क हे खाते शिवसेनेकडं होते. तेव्हा शंभूराज देसाई हे उत्पादनशुल्क मंत्री होते. मद्य व्यवसायात अजित पवारांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळं समितीचे अध्यक्षपद अजित पवारांना देण्यावरुन काहींचा आक्षेप आहे. दुसरीकडे राज्यात मोफत मद्यविक्री परवाना देण्यावरून मंत्रिमंडळात वाद झाल्याचं बोललं जात आहे. लाडकी बहीण योजनेकरिता ३६ हजार कोटींचा खर्च- राज्यात सुरू असलेल्या 'लाडकी बहीण योजने'मुळं काही निधी देण्यासाठी अतिरिक्त ताण येत आहे. त्यामुळं कर्जमाफीसाठी उशीर होत आहे असं म्हणत मंत्री प्रकाश आबिटकर यांनी नुकतेच मोठा गौप्यस्फोट केला होता. चालू आर्थिक वर्षात लाडकी बहीण योजनेसाठी ३६ हजार कोटीचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. गतवर्षी २ कोटी ५३ लाख लाभार्थ्यांसाठी ३३ हजार २३२ कोटी खर्च झाला आहे.

## सुप्रसिद्ध अभिनेते कोटा श्रीनिवास राव यांचं निधन

हैदराबाद : सुप्रसिद्ध अभिनेते तथा माजी आमदार कोटा श्रीनिवास राव यांचं निधन झालं आहे. मागील काही दिवसांपासून कोटा श्रीनिवास हे दीर्घ आजारानं ग्रस्त होते. यातच रविवारी पहाटे त्यांनी हैदराबादमधील फिल्मनगर इथल्या निवासस्थानी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनानं तेलुगु चित्रपटसृष्टीला मोठा धक्का मानला जात आहे. कोटा श्रीनिवास राव यांचा जन्म १० जुलै १९४२ रोजी आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील कांकीपाडू इथं झाला. त्यांनी १९७८ मध्ये प्रणम खरेधू या चित्रपटातून चित्रपटसृष्टीत पदार्पण केलं. कोटा श्रीनिवास राव यांनी ४ दशकांच्या चित्रपट कारकिर्दीत अनेक भूमिका साकारल्या आहेत. त्यांनी तब्बल ७५० पेक्षा अधिक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. १९९९ ते २००४ पर्यंत त्यांनी विजयवाडा पूर्व मतदारसंघाचे भाजपा आमदार म्हणून काम केलं. कोटा श्रीनिवास राव यांनी अभिनयानं खलनायकीला एक नवीन अर्थ दिला. रंगभूमीवर अनेक वर्षे मनोरंजन केल्यानंतर त्यांनी प्रेमा खरेधू या चित्रपटातून रुपेरी पडद्यावर पदार्पण केलं.

## क्रॉसिंग गेटवर रेल्वेचे 'झिरो ॲक्सिडेन्ट'चे लक्ष्य; मध्य रेल्वे नागपूर विभागात सुरक्षा मोहीम



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** ठिकठिकाणी असलेल्या रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंग (रस्त्याच्या मध्ये) गेटवर यापुढे एकही अपघात होऊ द्यायचा नाही, असे धोरण रेल्वेने आखले आहे. त्यानुसार, ठिकठिकाणच्या क्रॉसिंग गेटवर मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाकडून विशेष सुरक्षा मोहीम राबविली जात आहे.

ठिकठिकाणच्या गाव, शहर आणि वसाहतींमधून गेलेल्या रेल्वे लाइनच्या ठिकाणी रेल्वेने क्रॉसिंग गेट उभारले आहे. रेल्वेगाडी येण्याच्या पाच मिनिटांपूर्वी हे गेट बंद केले जाते. त्यामुळे गेटच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या, नागरिकांच्या रांगा लागतात. अशा वेळी काही जण गेटच्या दंड्याखालून जाऊन क्रॉसिंग गेट पार करतात. दुचाकीधारकांचा त्यात समावेश असतो. त्यांच्या या आगाऊपणामुळे अपघात होण्याची शक्यता असते. या अपघातामुळे नागरिकांसोबतच प्रशासनालाही त्रास होतो. ते रोखण्यासाठी रेल्वेने गेल्यावर्षीपासून क्रॉसिंग गेटच्या बाजूने अंडर ब्रीज किंवा ओव्हर ब्रीज बांधायला सुरुवात केली. ठिकठिकाणी अशा प्रकारे ब्रीज बांधून हे क्रॉसिंग गेट काढून टाकण्यात आले. मात्र, अनेक ठिकाणी हे क्रॉसिंग गेट अस्तित्वात असून, तेथून वाहतूक सुरू असल्याने अपघाताचाही धोका असतो. ते लक्षात घेऊन मध्य रेल्वेकडून आता मात्र 'झिरो ॲक्सिडेन्ट'चे टार्गेट ठेवून विशेष मोहीम हाती घेतली आहे.

## तिरुवल्लूर : इंधन वाहून नेणाऱ्या मालगाडीला आग; बचावकार्य सुरु

चेन्नई : चेन्नई बंदरातून इंधन घेऊन जाणारी एक मालगाडी तिरुवल्लूरजवळ अचानक रुळावरुन घसरली. त्यामुळं रेल्वेतील इंधनानं अचानक पेट घेतला. आगीच्या भीषणतेमुळं परिसर धुरानं व्यापला आहे. इंधनाची वाहतूक करणाऱ्या रेल्वेमध्ये मोठ्या प्रमाणात तेलाचा साठा असल्यामुळं आग आणखी पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. रेल्वेला लागलेल्या आगीत आत्तापर्यंत पाच डबे पूर्णपणे जळून खाक झाले आहेत.

इंधनाची वाहतूक करणाऱ्या रेल्वेला आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झालं. यानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहेत. सध्या घटनास्थळी १० हून अधिक अग्निशमन दलाच्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचं काम करत आहेत. तर स्थानिक सुरक्षिततेसाठी परिसरातील नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्याचं काम करत आहेत. यासह परिसरातील घरांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे. या घटनेनंतर तिरुवल्लूरचे जिल्हाधिकारी प्रताप यांनी घटनास्थळी भेट दिली.

## आळंदीत १९ वर्षाच्या तरुणीचं अपहण करून आळीपाळीने अत्याचार

**पुणे/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील एका तरुणीचं मागील महिन्यात २ जून रोजी अपहरण करण्यात आलं होतं. या पिडीत तरुणीला आळंदी येथील केळगाव रोडवर असलेल्या मुलींच्या एका खासगी वारकरी शिक्षण संस्थेमध्ये जबरदस्तीने डांबण्यात आलं. त्यानंतर तिच्यावर वारंवार लग्नासाठी दबाव टाकला गेला अन् तिच्यावर बलात्कार केला गेल्याची घटना समोर आली आहे. पीडित तरुणीने मोठी हिंमत दाखवून ११२ या हेल्पलाइन क्रमांकावर फोन करून पोलिसांना माहिती दिली अन् आता आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात अनेक धक्कादायक खुलासे झाल्याचं पहायला मिळतंय.

मागील महिन्यात आपल्या राहत्या घरी असलेल्या तरुणीला भेटण्यासाठी एक महिला कीर्तनकार आल्या. त्यावेळी पिडीत तरुणी घरात एकटी होती. शेतात फिरून येऊ, असं म्हणत तिला घराबाहेर आणलं. त्यानंतर तिला काळ्या चारचाकी गाडीत ( ४३ ७८१२) ढकललं अन् तिला पुण्यात आणलं. जास्त आवाज करु नको नाहीतर चेहऱ्यावर ॲसिड टाकेल, अशी धमकी दिला दिल्यामुळे तिला गप्प बसावं लागलं. पुण्यातील आळंदीत तिला एका खोलीत बंद करुन ठेण्यात आलं अन् वारंवार बलात्कार करण्यात आला.



अण्णासाहेब आंधळे, प्रवीण आंधळे, कीर्तनकार सुनिता आंधळे आणि अभिमन्यू आंधळे यांनी तिला एका खोलीत डांबून ठेवलं अन् तिच्यावर लग्नासाठी दबाव टाकला. अण्णासाहेब आंधळे याने तिच्यावर जबरदस्तीन वारंवार बलात्कार केला अन् लग्नासाठी तिला धमकी दिली. तरी देखील पिडीत तरुणीने विरोध केला. त्यानंतर संधी सापडताच तरुणीने पोलिसांना ११२ नंबरवर फोन लावला. तरुणीने ११२ या क्रमांकावर कॉल करून मदत मागितल्यानंतर पोलिसांनी तत्परता दाखवली आणि आरोपींना ताब्यात घेतलं आणि तरुणीची सुटका केला. त्यानंतर पालकांच्या सांगण्यावरून शेवगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# चिखलदरा पर्यटकांच्या गर्दीनं हाऊसफुल

## वाहने घाटात अडकून पडल्यानं अनेकांची निराशा

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** मेळघाटात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असल्यानं मेळघाटचं सौंदर्य पर्यटकांना खुणावत आहे. मेळघाटातील मुख्य पर्यटन स्थळ असणाऱ्या चिखलदरा येथे शनिवारी मोठ्या प्रमाणात पर्यटक आले होते. रविवारी देखील पर्यटकांच्या वाहनांचा ओघ चिखलदराच्या घाटात दिसून आला होता. चिखलदरा येथे रस्त्यावर वाहन उभे करायलाही जागा नाल्यामुळं चिखलदरा नाक्यावपासून खाली थेट मोथा आणि मडकी गावापर्यंत



वाहनाची रांग लागली.

भीमकुंडावरून कोसळणारा धबधबा यासह चिखलदरा येथील विविध पर्यटन स्थळांचा आनंद लुटण्यासाठी अमरावतीसह नागपूर, अकोला, यवतमाळ अशा विविध जिल्ह्यातून पर्यटक आली आहेत. चिखलदरामध्ये फिरायला आलेल्या पर्यटकांना घाटातून समोर वाहनं जात नसल्यामुळं चिखलदराला जाण्याचा बेत रद्द करावा लागला. अनेक पर्यटक सेमाडोह आणि मुख्यगिरीकडे वळलेत. तर काही पर्यटक चक्क आलेल्या मार्गानं आपल्या गावी परतले.

चिखलदरा येथे दोनशेच्यावर राहण्याची व्यवस्था असणारे सर्व हॉटेल फुल झाली आहेत. त्यामुळे अनेकांना चिखलदरा येथे इच्छा असूनही मुक्कामी राहणं शक्य नाही. विशेष म्हणजे चिखलदरा येथून बाहेर पडण्यासाठीदेखील पर्यटकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

चिखलदरा येथे पर्यटकांची गर्दी वाढल्यामुळं प्रशासनाच्यावतीनं परतवाडा, धामणगाव गढी मार्गे चिखलदरा जाण्याचा मार्ग एकेरी करण्यात आला आहे. अजून चिखलदरा येथून परतवाडा जाण्याकरिता घटांग मार्गानं केवळ पार्टीसाठी मार्ग सुरू ठेवला आहे.

## मतदारयाद्यांमध्ये घुसखोरांची नावे...

मतदानाचा हक्क हा लोकशाहीचा आत्मा! हा अधिकार केवळ देशाच्या नागरिकांचाच. मात्र, बिहारसारख्या राज्यात मतदारयाद्यांमध्ये घुसखोरांची नावे आढळून आल्याने खळबळ उडाली. निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या 'पडताळणी' मोहिमेने ही गंभीर बाब उघड केली. ही प्रक्रिया म्हणजे केवळ प्रशासकीय उपाययोजना नसून, लोकशाहीच्या शुचितेची ती निर्णायक लढाईच होय. बिहारमधील मतदारयादीतील विशेष 'पुनरावलोकन' मोहिमेमुळे, देशात पुन्हा एकदा 'मतदार' या कळीच्या मुद्द्यावरून वाद उफाळून आला आहे आणि यात केंद्रस्थानी आहे तो घुसखोरीचा गंभीर प्रश्न. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, बिहारमधील अनेक विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या संख्येने बांगलादेश, म्यानमार आणि नेपाळमधून आलेल्या घुसखोरांनी, बनावट कागदपत्रांच्या आधारे मतदारयादीतही घुसखोरी केल्याचे आढळले आहे. त्यांच्या नावावर केवळ मतदार ओळखपत्रच नव्हे, तर आधारकार्ड आणि रेशनकार्डदेखील असल्याचे स्पष्ट झाले आहे. हे पाहून जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीप्रधान देशात लोकशाहीच्याच मूलभूत आधारस्तंभांना कसे पोखरले जात आहे, याचे दाहक वास्तव समोर आले आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे सातत्याने निवडणूक आयोग आणि केंद्र सरकार यांच्यावर याच मतदानयादीवरून प्रश्नचिन्ह उभे करत, त्यांना आरोपीच्या पिंजर्यात उभे करण्याचे पाप करत आले आहेत. आता ही वस्तुस्थिती ते मान्य करणार की, पुन्हा एकदा स्वतःचा राजकीय स्वार्थ साधण्यासाठी काही नवा आरोप करणार, हे पाहावे लागेल. एखाद्या देशात मतदानाचा अधिकार केवळ त्या देशाच्या नागरिकालाच असतो. मात्र, बिहारमध्ये मतदारयादीचेच 'आंतरराष्ट्रीयीकरण' झाल्याचे निवडणूक आयोगाने उघड केले. ही केवळ व्यवस्थेतील त्रुटी नाही, तर एका योजनेतून आणि हेतूतून करण्यात आलेली 'लोकशाहीची चोरी' आहे. हे लक्षात घेतल्यावर आयोगाने अशा संशयित नोंदी दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणार्या अंतिम मतदारयादीतून वगळण्याची तयारी सुरू केली आहे. हे पाऊल उशिराने का होईना, पण आवश्यक होते. मतदारयादीतील 'पडताळणी' ही लोकशाही प्रक्रियेचा भाग असताना, काँग्रेस आणि तथाकथित 'धर्मनिरपेक्ष' विरोधी नेते या शुद्धीकरण मोहिमेला विरोध करत आहेत, हे धक्कादायक आहे. असदुद्दीन ओवेसी यांनीही निवडणूक आयोगावर अविश्वास व्यक्त करत आरोप केले की, सरकार आणि आयोगाची हातमिळवणी आहे. मात्र, याच वेळी त्यांनी एकही ठोस पुरावा न देता, पुन्हा एकदा स्वतःचाच शंका देशावर लादण्याचा प्रयत्न केला. निवडणूक आयोग बांगलादेशी, म्यानमारी आणि नेपाळी घुसखोरांना मतदारयादीतून हटवतो आहे, तर कोणाचाही याला विरोध असण्याचे कारण काय? यामागे 'व्होट बँक' सांभाळण्याचेच पारंपरिक राजकारण स्पष्टपणे दिसून येते. हीच मंडळी तुष्टीकरणासाठी कधी 'सीएए' तर कधी 'एनआरसी'ला विरोध करतात, तर कधी 'भारतमाता की जय'म्हणण्यासही नकार देतात. प्रखर राष्ट्रवादाचा मुद्दा आला की, ही मंडळी एका सुरात केंद्र सरकारवर हल्लाबोल करतात. तुष्टीकरण हेच त्यामागील कारण. निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात स्पष्टपणे सांगितले आहे की, आधारकार्ड हा नागरिकत्वाचा पुरावा नाही. ही बाब केंद्र सरकार पूर्वीपासून स्पष्ट करत आले आहे. तरीही काही राज्यांमध्ये फसव्या कागदपत्रांच्या आधारे नागरिकत्व मिळवले जाते आहे. विशेषतः सीमावर्ती राज्यांत याचे प्रमाण अधिक. अशा राज्यांमध्ये मतदारयादी शुद्ध करणे, म्हणजे लोकशाहीची सुरक्षा सुनिश्चित करणेच होय. पहिल्या दिवसापासून विरोधी पक्षांनी विशेषतः काँग्रेसने या शुद्धीकरणाला का विरोध दर्शवला होता, हे आता मतदारयादीतील घुसखोरी उघड झाल्याने स्पष्ट झाले. निवडणूक आयोगाने हे शुद्धिकरणाचे काम केवळ बिहारपुरतेच मर्यादित न ठेवता, सर्व राज्यात हाच 'शुद्धीकरणाचा' फॉर्म्युला लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी आयोगाने सर्व राज्यांना पत्रही पाठवले. देशाच्या एकात्मतेसाठी हे पाऊल अत्यावश्यक असेच. सर्वोच्च न्यायालयानेही आयोगाच्या या निर्णयावर प्रश्न उपस्थित करत विचारणा केली की, ही प्रक्रिया इतया उशिरा का सुरू करण्यात आली? निवडणुका अगदी काही महिनेच दूर असताना नागरिकत्व पडताळणी करणे गृहमंत्रालयाच्या अधिकार क्षेत्रात येते की नाही, हाही मुद्दा न्यायालयाने उपस्थित केला. मात्र, निवडणूक आयोगाने भारतीय संविधानाच्या 'कलम ३२६'नुसार हे तपासणे आपले कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले. असदुद्दीन ओवेसी यांनीही बीएलओंना प्रशिक्षण नाही, त्यांच्याकडे हॅण्डबुक नाही, अशी टीका केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, स्थलांतरित कामगारांजवळ कागदपत्रे नसतात, म्हणूनच ही प्रक्रिया अन्यायकारक आहे. तथापि, एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, स्थलांतरित कामगार आणि बेकायदेशीर घुसखोर यांत मूलभूत फरक आहे. यापैकी काहींना पाकिस्तान, बांगलादेश किंवा नेपाळातून योजनाबद्धरित्या भारतात पाठवण्यात आल्याचे गुप्तचर अहवाल सांगतात. असे असतानाही, लोकशाहीवर आघात करणार्या बेकायदेशीर 'घुसखोरीच्या' साखळीला ओवेसी किंवा काँग्रेस पाठिंबा का देत आहेत? हा प्रश्न उपस्थित होतो. राहुल गांधी हे लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत. सुदृढ लोकशाहीसाठी लोकसभेत हे पद आवश्यक असेच. मात्र, राहुल यांनी या पदाचा गैरवापर करत, काँग्रेसच्या राजकीय स्वार्थासाठीच या पदाचा वापर केला. त्यांनी बिहारमध्ये होत असलेल्या पडताळणी मोहिमेला महाराष्ट्रातील निवडणुकांशी जोडून, 'निवडणूक चोरी'चाही आरोप केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रातही मतदारयादीत अचानक एक कोटी नवे मतदार दिसून आले आणि ही वाढ भाजप सत्ताधार्यांच्या फायद्यासाठी झाली होती. काहीही पुरावा न देता अशा प्रकारचा आरोप करणे, ही काँग्रेसची जुनी सवय आहे. बिहारमध्ये मतदारयादीत आढळून आलेले घुसखोर हे केवळ मतदारयादीचे उल्लंघन नव्हे, तर देशाच्या सुरक्षेसाठी असलेला तो गंभीर धोका आहे. याच राज्यात अनेकदा राष्ट्रविरोधी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या गटांचे पुरावे सापडले आहेत. नेपाळ आणि म्यानमारमार्गे भारतात शिरणार्या अनेक धर्मांधांचा वापर देशविघातक कृत्यांसाठी केला जातो. अशा देशद्रोही धर्मांधांना मतदानाचा हक्क मिळाल्यास, भारतीय लोकशाहीसमोरचा धोका अधिकच वाढेल.

# द्वंद्वाची उत्तरे मिळतात तेच खरे प्रभावी साहित्य : डॉ. नीलम गोऱ्हे

- पुलंचा वारसा जपणारे डॉ. आशुतोष जावडेकर सर्जनशील लेखक : डॉ. नीलम गोऱ्हे
- रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे डॉ. आशुतोष जावडेकर यांचा काव्य प्रतिभा पुरस्काराने गौरव

दैनिक आपला विदर्भ

**उदय नरे**

**पुणे :** माणसाच्या मनातील द्वंद्वाची उत्तरे जेव्हा साहित्यातून सापडतील तेव्हाच ते साहित्य अधिक प्रभावी ठरेल, असे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. संगीतकार, गीतकार, कवी, लेखक, डॉक्टर असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. आशुतोष जावडेकर यांनी राजकीय पार्श्वभूमी असूनही स्वत:ची सर्जनशीलता जपली आहे; त्यांचे लिखाणही प्रभावी आहे. ते खऱ्या अर्थाने पु. ल. देशपांडे यांचा वारसा जपणारे आहेत, असे गौरवोद्गार विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काढले.

रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे काव्य प्रतिभा पुरस्काराने प्रसिद्ध व्याख्याते, लेखक, कवी डॉ. आशुतोष जावडेकर यांचा आज (दि. १३) डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्या वेळी डॉ. गोऱ्हे अध्यक्षपदावरून बोलत होत्या. ज्येष्ठ विचारवंत लेखक, कवी डॉ. राजा दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर, मैथिली आडकर मंचावर होते. सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. नवी पेठेतील पत्रकार भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.






### ट्रोलिंगसाठी टोळ्या...

पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त वातावरण वैचारिक आणि आनंददायी असल्याने सभात्यागाची भीती नाही, असे डॉ. निलम गोऱ्हे यांनी सांगताच सभागृहात हशा पिकला. समाजमाध्यमावरील ट्रोलिंगचा मुद्द्याविषयी बोलताना त्या म्हणाल्या, ट्रोलिंग करण्यासाठी राजकारण्यांनी टोळ्या केल्या आहेत. त्या एक-दोन दिवस ट्रोल करतात पैसा संपला की थांबतात. मी मात्र अशा प्रकारापासून दूर आहे.

### समाजमाध्यमांमुळे अभिव्यक्तीचे लोकशाहीकरण : डॉ. जावडेकर

संतसाहित्यामुळे कवितेची ताकद कळल्याचे सांगून सत्काराला उत्तर देताना आशुतोष जावडेकर म्हणाले, श्रवणसुखाच्या मांडवात संगीतकार भेटले, काव्याला चाली देताना कवी भेटले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि शेक्सपिअर साहित्याच्या क्षेत्रातील गुरू आहेत. सध्याच्या काव्यप्रांतावर टीका करताना डॉ. जावडेकर म्हणाले, काव्याच्या व्यासपीठावर हिणकस प्रकार सुरू आहेत. त्या मानाने समाजमाध्यमांवरील कविता चांगल्या आहेत. संपादनाचा अभाव असला तरी अभिव्यक्तीचे लोकशाहीकरण झाल्याचे जाणवते आहे. गीत, काव्य लिखाणाप्रमाणेच गद्य लिखाणातही लय असावी लागते. काव्य लिखाण हे शास्त्रच आहे ते जर पेलता आले नाही तर विस्फोटक ठरू शकते. कविता जगता आली पाहिजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

तरुण पिढीमुळे सामाजिक-राजकीय परिवर्तन होत असल्याचे सांगून डॉ. निमल गोऱ्हे म्हणाल्या, पुस्तक हेच प्रभावी माध्यम आहे इतर माध्यमे नाहीत, अशी सध्याची परिस्थिती नाही. समाजमाध्यमेही प्रभावी आहेत. समाजमाध्यमांद्वारे अर्थपूर्ण संवाद झाला पाहिजे. परस्परातील संवाद कमी झालेला असताना तो वाढविण्यासाठी रंगत-संगत प्रतिष्ठान विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न करीत असल्याबद्दल त्यांनी ॲड. प्रमोद आडकर यांचे कौतुक केले.

साहित्याच्या क्षेत्रातील डॉ. आशुतोष जावडेकर यांची कामगिरी अष्टपैलू असून त्यांना शब्द, सूर आणि लय त्यांना सापडली असल्याचे डॉ. राजा दीक्षित म्हणाले.

सुरुवातीस ॲड. प्रमोद आडकर यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला.

पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त आयोजित निमंत्रितांच्या कविसंमेलनात बंडा जोशी, प्रमोद खराडे, माधव हुंडेकर, मृणालिनी कानिटकर-जोशी, तनुजा चव्हाण, वर्षा बेंडिगेरी-कुलकर्णी, स्वप्नील पोरे, सुजित कदम, विजय सातपुते, डॉ. मृदुला कुलकर्णी-खैरनार यांचा सहभाग होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा देशपांडे यांनी केले तर मानपत्राचे वाचन प्राजक्ता वेदपाठक यांनी केले.

## प्रेम मिळवण्यासाठी सिद्धांत-तृप्तीनं युद्ध पुकारले, धडक २चा ट्रेलर झाला रिलीज

**मुंबई/प्रतिनिधी :** करण जोहरच्या धडक २ चित्रपटाचा धमाकेदार ट्रेलर आज ११ जुलै रोजी प्रदर्शित झाला आहे. सिद्धांत चतुर्वेदी आणि तृप्ती डिमरी स्टारर धडक २ हा २०१७ मध्ये आलेल्या धडक चित्रपटाचा सीक्केल आहे. चित्रपटाच्या पहिल्या भागात ईशान खट्टर आणि जान्हवी कपूर होते आणि आता चित्रपटाच्या दुसऱ्या भागात सिद्धांत चतुर्वेदी आणि तृप्ती डिमरी आहेत. धडक २चा ट्रेलर खूप भावनिक आहे , जो तुमच्या अंगावर काटा आणेल. धडक २चा ट्रेलर पाहिल्यानंतर, तुम्हाला हा चित्रपट पाहण्याची नक्की इच्छा होईल.

धडक २चा ३.०४ मिनिटांचा ट्रेलर प्रेक्षकांना सुरुवातीपासूनच भुरळ घालणार आहे. त्याची सुरुवात नीलेश (सिद्धांत) आणि विधी (तृप्ती) यांच्यातील प्रेमानं होते, मात्र जातिव्यवस्था नीलेशला विधीपासून दूर राहण्यास भाग पाडते. जातीमुळं नीलेशला त्याच्या कॉलेजमध्ये खूप मारहाण आणि अत्याचार सहन करावे लागतात. नीलेश उच्च जातीच्या विधीला समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो ,की त्याचे प्रेम पूर्ण होऊ शकत नाही, मात्र विधी म्हणते की, ती नीलेशचे प्रेम मिळविण्यासाठी संपूर्ण जगाशी लढेल. ट्रेलरमध्ये दाखवले आहे की, हा चित्रपट जातिव्यवस्थेत अडकलेल्या एका तरुणाबद्दल आहे, ज्याला आपले प्रेम मिळविण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो.

## सोयजना ग्रामपंचायतीचा बच्चू कडू यांच्या पदयात्रेस पाठिंबा

### आंबोडा येथील सभेस हजर सुपर्ण गावाची ग्वाही



दैनिक आपला विदर्भ

**मानोरा/प्रतिनिधी :** सात-बारा कोरा पदयात्रेला तालुक्यातील सोयजना येथील ग्रामपंचायत ने ठराव घेऊन ७/१२ कोरा यात्रेस पाठिंबा दिला व संपूर्ण गावातील नागरिकांनी १४ जुलै रोजी होणाया आंबोडा येथील सभेस हजर राहण्याची ग्वाही सरपंचा दिव्या अजय चव्हाण, हरिभाऊ मिसाळ, कान्हापात्रा कोल्हे व गावकरी मंडळीने दिली. प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या सात बारा कोरा यात्रेचा पहिला मुक्काम २१ किमीचा पार केल्यानंतर उंबर्डा बाजार येथे होता. मुक्काम स्थळी सभा घेत सातबारा कोरा होईपर्यंत लढा सुरूच राहणार व सरकारने आमच्या मागण्या पूर्ण नाही केल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा बच्चू कडू यांनी भाषणातून सरकारला दिला. निवडणुकीला दिलेल्या आश्वासन फक्त भाजप व मित्र पक्षाने शेतकयाचे मत मागण्यासाठीच शेतकयांचा वापर केला. असे बोलून त्यांनी सरकार वर टीका केली. जोपर्यंत शेतकयांना दिलेला शब्द सरकार पूर्ण करणार नाही तो पर्यंत आम्ही शांत बसणार नाही.असा इशाराही यावेळी बच्चू कडू यांनी दिला.संपूर्ण महाराष्ट्रभर २ हजार किलोमीटर यात्रा पायदळ फिरून शेतकयांना एकजुट करू व सरकार विरोधात तीव्र आंदोलन करू असे सागितले.तर,सातबारा कोरा यात्रेचे १४ जुलै रोजी महागाव तालुक्यातील अंबोडा येथे होत आहे. समारोपानिमित्त आयोजित सभेला नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शाम पवार यांनी केले आहे.

## जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती





दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** जागतिक लोकसंख्या दिनाच्या निमित्ताने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा विधिज्ञ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने पोदार इंटरनॅशनल स्कूल येथे कायदेविषयक जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र स्टेट लीगल सर्व्हिसेस अथॉरिटी गीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. व्ही. हांडे होते.कार्यक्रमात प्राचार्य आरती डोंमकुलवार, जिल्हा विधिज्ञ संघाचे उपाध्यक्ष वैभव तिफणे आणि कोषाध्यक्ष डी. डी. गुडदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात सचिव व्ही. जी. चौखंडे यांनी पोक्सो कायदा व जागृती,नालसा योजना २०२५ यावर मार्गदर्शन केले.

सहाय्यक न्यायरक्षक हेमंत इंगोले यांनी जागतिक लोकसंख्या दिन या विषयावर मार्गदर्शन केले. विधिज्ञ विद्या पिंजरकर यांनी बालकांचे अधिकार, शिक्षणाचा अधिकार आणि बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानावर माहितीपर सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि प्रस्तावना शिक्षक हदयनाथ खंडाळेकर यांनी केले. तर, शिक्षक कांचन केशवाणी यांनी आभार मानले. सदर उपक्रमाला शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचायांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## ढाणकी पोलीस चौकी येथे गणेश उत्सवा निमित्त गणेश मंडळाची बैठक

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** पो स्टे बिटरगावं हद्दीतील दुरक्षेत्र ढानकी येथे होणाऱ्या गणेश उत्सव संबंधाने ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी दि ११ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता ढानकी येथील सर्व गणेश मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांची गणेश उत्सव संबंधाने बैठक घेतली. बैठकी मध्ये गणेश उत्सव काळात घ्यावयाची काळजी याबाबत सूचना दिल्या,प्रत्येक गणेश उत्सव मंडळानी गणेश स्थापने पूर्वी ऑनलाईन परवानगी काढून घ्यावी, गणेश मूर्ती ची स्थापन रस्त्यावर करू नये, गणेश मूर्ती समोरील देखावे व लाईट मोठे वाहने पास होतील असे पद्धतीने लावावे, जेथे गणेश मूर्ती स्थापन होणार आहे त्या जागा मालकाची परवानगी , नगर पंचायत ची परवानगी, विद्युत विभागाची परवानगी काढून घ्यावी, गणेश मूर्तीची उंची आपल्या गावातील रस्त्याने सहज पास होईल अशी असावी गणेश स्थापना मिरवणुकीत कोणतेही गणेश मंडळ कट आउट ठेवणार नाही, आक्षेपार्ह स्लोगन चे बॅनर लावणार नाही, बॅनर वर कोणत्याही प्रकारचा नंबर चा उल्लेख असल्याचे निदर्शनास आल्यास सदर मंडळावर तात्काळ कार्यवाही करून बॅनर नगर पंचायत कडून काढून घेण्यात येईल तसेच डिजे मुक्त



मिरवणूक करण्याबाबत सूचना देऊन सर्वांना मार्गदर्शन केले, बैठकीला गणेश मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमवार, बिट जमादार मोहन चाटे,जमादार रवी गिते,गोपनीय विभाग प्रकाश मुंडे यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# स्वच्छतेचा प्रश्न व वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी तात्काळ नियोजन करा

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे यंत्रणेला निर्देश







**पुणे/प्रतिनिधी :** हिंजवडी, राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्राला अधिक चालना देण्याकरिता परिसरातील नागरिकांच्या समस्या लवकरात लवकर सोडण्यासाठी सर्व संबंधीत यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, या भागात पावसामुळे साचणारे पाणी, स्वच्छतेचा प्रश्न व वाहतुकीची समस्या सोडवण्यासाठी तात्काळ नियोजन करून त्याची अंमलबजावणी करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हिंजवडी आयटी पार्क परिसरातील समस्या व पुणे मेट्रो लाईन तीन च्या कामाच्या पाहणीनंतर आयोजित आढावा बैठकीत संबंधित यंत्रणाना दिल्या. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला आमदार शंकर मांडेकर, विभाग आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे शहरचे पोलीस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, पिंपरी चिंचवड शहरचे पोलीस सहआयुक्त शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, सार्वजनिक बांधकाम विभाग अधीक्षक अभियंता अतुल चव्हाण, मुख्य अभियंता श्रीमती रिनाज पठाण, एमआयडीसीचे अतिरिक्त मुख्याधिकारी विजय राठोड उपस्थित होते

## संक्षिप्त...

### गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी; स्वामी समर्थ मंदिरात भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ

दैनिक आपला विदर्भ

**मालेगाव/प्रतिनिधी :** गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून स्वामी समर्थ मंदिरामध्ये १० जुलै रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हजारो भाविकांनी स्वामी समर्थ मंदिरात हजेरी लावून दर्शनाचा लाभ घेतला. गुरु पौर्णिमेनिमित्त श्री स्वामी समर्थ केंद्रामध्ये सजावट करण्यात आली. सकाळी आरती करण्यात आली. तसेच दुपारी दीड वाजता स्वामी समर्थ गुरूंना नैवेद्य व इतर धार्मिक कार्यक्रम झाले. तर, सायंकाळी महानैवद्य तसेच महाआरती व श्रीफळ ठेवून विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी हजारो महिला व पुरुषांनी प्रसादाचा लाभ घेतला. सदर गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्याकरिता सेवेकयांनी अथक परिश्रम घेतले.

### उपक्रमशील शिक्षकांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मान




दैनिक आपला विदर्भ

**मालेगाव/प्रतिनिधी :** वाशीम जिल्हा परिषद व ओपन लिंक फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाया आचार्य विनोबा भावे शिक्षक सहाय्यक कार्यक्रम अर्थात विनोबा (बा) ॲपच्या माध्यमातून जिल्ह्यातील उपक्रमशील शिक्षकांचा उल्लेखनीय कार्याबद्दल एप्रिल,मे, जून या तीन महिन्यांतील तालुकास्तरावरील पोस्ट ऑफ द मंथ पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा नुकताच गौरव करण्यात आला. या पुरस्कारासाठी अंजूताई नांदूरकर,नाझिया शेख,रश्मी ठाकूर,अनिल सोळंके व मंचकराव तायडे यांची निवड करण्यात आली.या सर्व शिक्षकांनी शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण पद्धतीने काम करत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेतील वाढ साधली. त्यांच्या कार्याची दखल घेत कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात अधीक्षक, विस्तार अधिकारी आणि कार्यालयातील सर्व कर्मचारी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी अधिकारी वर्गाने उपस्थित शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले. यावेळी सर्व विषयसाधन व्यक्ती,समग्र शिक्षेतील पुरस्कारप्राप्त शिक्षक तसेच ओपन लिंक फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक अजय राठोड यांनी कार्यक्रमात उपस्थित राहून शिक्षकांना प्रोत्साहित केले.

### अहमदाबादनंतर आता ब्रिटनमध्ये प्लेन क्रॅश, टेकऑफनंतर हवेतच विमान जळून खाक

लंडन : अहमदाबादमधील एअर इंडियाचा विमान अपघात ताजा असतानाच ब्रिटनमध्ये विमान कोसळलं आहे. ब्रिटनच्या साउथेंड एअरपोर्टवरून टेकऑफ केल्यानंतर काही वेळातच बीचक्राफ्ट बी२०० हे छोटं प्रवासी विमान कोसळलं आहे. हे विमान ब्रिटनमधून हे विमान नेदरलँड्समधील लेलीस्टॅडला जात होतं, पण टेकऑफनंतर विमानाला आग लागली, ज्यामुळे विमान धावपट्टीजवळ कोसळलं.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार विमानाचं रुपांतर अचानक आगीच्या गोळ्यात झालं. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटोंमध्ये विमानातून धूर आणि ज्वाळा बाहेर येताना दिसत आहेत. टेकऑफ केल्यानंतर काही मिनिटांमध्येच तांत्रिक बिघाड झाला, ज्यामुळे विमानाचं नियंत्रण सुटलं आणि धावपट्टीजवळ मोठा आवाज झाला.अपघाताची माहिती मिळताच एसेक्स पोलिस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचल्या आणि बचावकार्य सुरू केले. विमानात किती लोक होते? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही, परंतु स्थानिक प्रशासन आणि विमान वाहतूक प्राधिकरणाकडून मृतांची संख्या निश्चित केली जात आहे. एसेक्स पोलिसांनी एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, साउथेंड विमानतळावर विमान अपघात झाला आहे. आमच्या आपत्कालीन सेवा घटनास्थळी पोहोचल्या आहेत आणि परिस्थिती नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत आहेत.

### हिंदू व्यापाऱ्याला जमावानं संपवलं; बांगलादेशात धार्मिक हिंसाचार सुरुच

ढाका: बांगलादेशची राजधानी ढाक्यामध्ये एका हिंदू व्यावसायिकाची जमावाने हत्या केल्याने खळबळ उडाली आहे, या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर देशभरात निदर्शने सुरू झाली आहेत. लाल चंद सोहाग असे हत्या झालेल्या व्यावसायिकाचे नाव असून ते ढाक्याच्या जुन्या भागात रहात होते. जमावाने केलेल्या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला, या घटनेमुळे अंतरिम सरकारवर निष्क्रियतेचा आरोप करत विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत.

पीटीआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. व्हिडिओमध्ये दिसत आहे की, हल्लेखोरांनी सोहागला काँक्रीटच्या स्लॅबने बेदम मारहाण केली आणि जोपर्यंत त्याचा मृत्यू झाला नाही, तोपर्यंत मारत राहिले. क्रूरतेची परिसीमा इथेच थांबली नाही, तर हल्लेखोर त्याच्या मृतदेहावर नाचताना दिसत आहेत. ही घटना मिटफोर्ड रुग्णालयासमोर घडली, जिथे दिवसाढवळ्या त्याच्यावर हल्ला करण्यात आला.

# भारत प्राथमिक शाळेत शिक्षक पालक सहविचार सभा संपन्न




दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील भारत प्राथमिक शाळेत १२ जुलै रोजी शिक्षक-पालक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका किरणताई दुबे ह्या होत्या यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून कैलास अलोने, गजानन साखरे, सुरेश गोरेकर, दीक्षा सोनवणे , नुसरत खानम व प्रतिमा जुमडे मंचावर उपस्थित होते. विद्येची देवता माता सरस्वती तथा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनाने सभेस सुरुवात झाली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढी संदर्भात समस्या सोडवण्यासाठी व पालक शिक्षक समन्वय घडवून आणण्यासाठी पालक शिक्षक संघ, माता पालक संघाची स्थापना याप्रसंगी करण्यात आली.यावेळी मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांनी शाळेच्या अध्यक्षा जयश्रीताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली.'' विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी व शिक्षण प्रक्रिया अधिक सुदृढ होण्यासाठी पालक व शिक्षक यांचा सहविचार संवाद होणे आवश्यक असते, कारण विद्यार्थी व पालक या दोघामध्ये शिक्षक एक संवेदनशील भूमिका पार पाडत असतो.''असे मुख्याध्यापिका किरणताई दुबे पालकांशी संवाद साधताना म्हणाल्या.

यांनतर पूर्व उच्चप्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीमध्ये स्थान प्राप्त केलेले विद्यार्थी आस्था डिडवाणी ,अंश रासकर, रितेश बशीरे, समर्थ पायघन व प्रतीक अलोने आदी विद्यर्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

सदर सभेमध्ये विविध विषय मांडण्यात आले. विद्यार्थ्यांची गुणवत्ता, उपस्थिती, स्वच्छता, शारीरिक व बौद्धिक विकास कसा साधता येईल, या विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी पालक प्रतिनिधी केशव गरकळ, प्रतिमा जुमडे यांनी शाळेत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक धनंजय वाघ यांनी केले तर अमोल मोरे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

### विद्यार्थ्याचं शारीरिक शोषण नाही तर सहमतीनं प्रेमसंबंध; जामीनसाठी दाखल याचिकेत शिक्षिकेचा दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** नामांकित शाळेतील शिक्षिकेनं अल्पवयीन विद्यार्थ्यासोबत शारीरिक संबंध ठेवल्याच्या प्रकरणात महत्त्वाची अपडेट आहे. पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेल्या शिक्षिकेनं मुंबई उच्च न्यायालयात जामीनसाठी याचिका दाखल केली आहे. यात शिक्षिकेनं विद्यार्थ्यासोबत कधीही जबरदस्ती केली नव्हती, असा दावा केला आहे. शालेय विद्यार्थ्यासोबत जबरदस्तीनं शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याच्या आरोपात अटकेत असलेल्या शिक्षिकेनं आता मुंबई सत्र न्यायालयानं न्यायालयात जामीसाठी याचिका दाखल केलीय. विद्यार्थी हा संबंधात राहण्यासाठी हट्टाला पेटला होता. आपण त्याला बऱ्याचदा समजावण्याचा प्रयत्नही केला होता, असा दावा शिक्षेकेच्यावतीनं याचिकेत केला आहे. त्यामुळं या प्रकरणाला आता वेगळचं वळण लागण्याची शक्यता आहे. विद्यार्थी आपल्या प्रेमात पडला होता. त्याला आपण बऱ्याचदा समजवण्याचा प्रयत्न केला. पण, तो ऐकतच नव्हता. संबंध कायम ठेवण्यासाठी तो आपल्या मागे तगादा लावून होता, असा दावा अटकेत असलेल्या शिक्षिकेनं केला आहे. विद्यार्थ्यानं पाठवलेले मेसेजे आणि ईमेल हे दावा सिद्ध करण्यासाठी शिक्षिकेनं याचिकेसोबत जोडले आहेत. इतकंच नव्हे तर विद्यार्थ्याच्या पालकांनाही याची कल्पना असावी, अशी शक्यता व्यक्त केली. कारण त्यांनी मधल्या काळात त्या विद्यार्थ्याचा मोबाईल आणि लॅपटॉप त्याच्याकडून काढून घेतला होता. त्याचेही ईमेल पुरावे म्हणून शिक्षिकेच्यावतीनं जोडण्यात आलेत. शिक्षिकेला न्यायालयीन कोठडीत पाठवताच तिच्या वकिलांनी जामीनाची याचिका तयार करण्यास सुरूवात केली होती.

# ठाणेदार मूंडे यांच्या कार्याची भारतीय सेनेच्या कर्नल कडून पत्राद्वारे प्रशंसा

दैनिक आपला विदर्भ

■ अयाज काजी



**दिग्रस :** ठाणेदार वैजनाथ मुंडे यांनी एका सेवारत सैनिकाच्या कुटुंबाच्या तक्रारीवर तात्काळ व निष्पक्ष कारवाई करून खऱ्या अर्थाने पोलिस सेवेचे उदाहरण उभे केले आहे. मराठा लाइट इन्फंट्रीच्या जंगी पलटणीत कार्यरत असलेल्या भारतीय सैनिक सचिन गावंडे यांच्या भावावर झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणात त्यांनी त्वरित दखल घेऊन संबंधित आरोपीला ताब्यात घेतले. संबंधित घटना ता.१८ जून २०२५ रोजी काही स्थानिक गुंडांनी सुधाकर बंडू गावंडे यांच्यावर विनाकारण प्राणघातक हल्ला केला. ठाणेदार मूंडे यांनी पोलीस पथक पाठवून आरोपींना ताब्यात घेऊन दिग्रस पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला. यावेळी भारतीय सैनिक सचिन गावंडे हे देश सेवेत असल्यामुळे संबंधित घटनास्थळी उपस्थित नव्हते. त्यांनी यासंदर्भात थेट ठाणेदार मुंडे यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली होती.

ठाणेदार मुंडे यांनी अत्यंत व्यावसायिकतेने, संवेदनशीलतेने व तत्परतेने या प्रकरणाची चौकशी सुरू केली व पीडित भारतीय सैनिकाच्या कुटुंबाला न्याय मिळवून दिला. त्यांच्या या कार्य पद्धतीचे भारतीय सैनिकाचे कर्नल सचिन होनावाड (कमांडिंग ऑफिसर, मराठा लाइट इन्फंट्री ) यांनी विशेष कौतुक केले आहे. त्यांनी पोलिस अधिक्षक कुमार चिंता यांना पाठवलेल्या पत्रात ठाणेदार मुंडे यांच्या कार्यषशैलीचे गौरवपूर्ण उल्लेख करत भारतीय सैन्य आणि नागरिक पोलिस यांच्यातील सुसंवाद अधिक बळकट झाल्याचे नमूद केले आहे.

सैनिक देशासाठी सीमेवर लढत असताना त्यांच्या कुटुंबाच्या सुरक्षेसाठी ठाणेदार मुंडे यांनी दाखवलेली तत्परता हा इतर पोलिस अधिकाऱ्यांसाठीही प्रेरणादायी आहे. या कार्यामूळे दिग्रस तालुक्यातील नागरिकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# रिसोड पोलिस स्टेशनच्या नविन वसाहतीचा प्रश्न लागणार मार्गी

## तत्कालीन ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकुर यांच्या प्रस्तावाला आ.झनक यांनी मांडले अधिवेशनात

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील पोलिस स्टेशन अंतर्गत अधिकारी,कर्मचारी वर्गाच्या वसाहतीसाठी तत्कालीन ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकुर यांनी प्रारंभी पासुनच पाठपुरावा केला होता.यावर आमदार अमित झनक यांनी सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केल्यामुळे येथिल पोलिस वसाहतीचा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रिसोड शहरासह,तालुक्याची वाढती लोकसंखेवर कायदा सुव्यवस्थेबाबत पोलिसांची भुमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते,रिसोड हे अतिशय महत्त्वपूर्ण बाजारपेठ आसुन शहराच्या मधुन रिसोड-मालेगाव,रिसोड-लोणार सरोवर,रिसोड-मालेगांव,रिसोड-वाशीम,रिसोड-हिंगोली सारखे महत्वाचे राज्य मार्ग जातात परंतु येथिल पोलिस स्टेशन आवारातील पोलिस वसाहती मागील विस वर्षांपासून जिर्ण झालेल्या आसल्याने पोलिस स्टेशन अंतर्गत अधिकारी,कर्मचारी नाईलाजास्तव कधी अपडाऊन तर कधी शहरातील मिळेल त्या कॉलनी,नगरामध्ये राहात आहेत.पर्यायाने पोलिस स्टेशन च्या अंतरावर आसलेल्या पोलिस अधिकारी,कर्मचारी वर्गाला कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यास मोठ्या आडचणी निर्माण होत आहेत.यावर तत्कालीन ठाणेदार देवेंद्रसिंह ठाकुर यांनी मागील तीन वर्षा पुर्वी रिसोड पोलीस स्टेशन अंतर्गत वसाहती साठी पाठपुरावा केला होता.त्यावेळेस हिंगोली रस्त्या वरील ग्रामीण रूग्णालया समोर हिंगोली रोड लगत गट क्रमांक २०६ मध्ये ईक्लास जमिन उपलब्ध आसलेल्या ठिकाणी नवीन पोलिस वसाहती संदर्भात जागेचे मोजमाप सुध्दा करण्यात आले होते.परंतु परत हा पोलिस वसाहतीचा प्रश्न दुर्लक्षित झाला होता.परंतु सध्या सुरू आसलेल्या पावसाळी अधिवेशना मध्ये आमदार अमित झनक यांच्या माध्यमातून येथिल पोलिस वसाहतीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आलेला आहे.त्यामुळे रिसोड पोलिस स्टेशन अंतर्गत अधिकारी,कर्मचारी वर्गाच्या हक्काच्या वसाहतीचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी संकेत मिळाल्याने येथील पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# आपली समस्या - आपला पुढाकार अभियाना अंतर्गत कार्यशाळा

## मुव्हमेन्ट फॉर पिस ॲन्ड जस्टीस ( एम पी जे ) चा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** आज महाराष्ट्रातील प्रत्येक शहर आणि गावातील लोकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता, सुरक्षा, आरोग्य, शिक्षण यासारख्या समस्यांना प्रत्येक व्यक्तीला तोंड द्यावे लागते. या समस्या सोडवण्यासाठी, सर्व भागधारकांनी (सरकार, नागरिक आणि स्थानिक प्रशासन इत्यादी) या समस्यांबद्दल संवेदनशील असणे आणि त्यांना उपाय प्रक्रियेत सहभागी करून घेणे महत्वाचे आहे. ही मोहीम स्थानिक समस्यांवर प्रकाश टाकण्याचा आणि त्या सोडवण्यासाठी सामूहिक प्रयत्न सुरू करण्याचा प्रयत्न आहे.

स्थानिक समस्या ओळखणे आणि अधोरेखित करणे ,या समस्यांबद्दल सर्व भागधारकांना संवेदनशील करणे ,सामान्य माणसाला सक्षम करणे आणि सार्वजनिक समस्यांच्या निराकरणात लोकसहभाग सुनिश्चित करणे जेणेकरून ते त्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठी आवाज उठवू शकतील. या उदात्त उद्देशाने मुव्हमेन्ट फॉर पिस ॲन्ड जस्टीस (एमपीजे ) या सामाजिक संघटने तर्फे राज्यभर एक महीना समस्या आपली -पुढाकार आपला अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाअंतर्गत जिल्हातील कार्यकर्ता साठी स्थानिक गुरु कॉम्पलेक्स नांदेड रोड येथे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. यात तंझीम अन्सारी प्रदेश उपाध्यक्ष, अलताफ हुसेन प्रदेश कार्यकरिणी सदस्य, ॲड . यांनी मार्गदर्शन केले या वेळी कमाल अन्सारी भिवंडी, हाफीज अन्सार, फिरोज अंसारी उपस्थित होते.

कार्यशाळेसाठी डॉ फारूक अबरार, इरफान खान, सै रजा, रेखा ताई गायकवाड, आरेफा नसीर, स्वरांजली वाघमारे, फरहत जहा, शफील राज, प्रकाश चव्हाण, शेवाळे टेलर, कय्युम अली, तस्लीम अहेमद, सै. सलीम, कामरान खान,




जुनेद शेख, फैसल अकील आदी कार्यकर्तेनी परिश्रम घेतले.

# अनधिकृत लेआउट प्रशासनाच्या रडारवर

## मेहकर तालुक्यातील ४ एन ए लेआउट रद्द : प्लॉट विक्रीत सावळागोंधळ

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** येथील अनधिकृत लेआउट विक्रेत्यांनी अनेकांना गंडवल्यानंतर याबाबत अनेक तक्रारी झाल्या दाखल झाल्या. सदर दाखल तक्रारीची प्रशासनाने गंभीर दखल घेत मेहकर तालुक्यातील या अगोदर २३ ले-आऊटची खरेदी-विक्री पुढील आदेशापर्यंत रद्द केले. त्यामुळे मेहकर येथील खरेदी-विक्रीचे व्यवहार ठप्प झाले असून अनेकांचे आर्थिक व्यवहारही रडखडले आहे.परिणामी, प्लॉटखरेदी व विक्रीधारकांमध्ये कमालीचे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशातच पुन्हा चार लेआउट ची परवानगी रद्द केल्याने अनाधिकृत लेआउट विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.


संग्रहीत छायाचित्र

मेहकर उपविभागात येणाऱ्या लोणार व मेहकर तालुक्यातील काही ले-आऊटसाठी अकृषक जमिनीच्या मंजुरी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे निष्पन्न झाले आहे. नगररचना कार्यालयाची कुठलीही परवानगी नसताना किंवा पळवाट काढून आवश्यक अहवाल प्राप्त नसताना देखील अनेक ले आउट मंजूर करण्यात आले.यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला आहे. त्यावर एसडीओ रवींद्र जोगी यांनी नोटीस बजावल्या होत्या. दरम्यान, उपरोक्त नियमबाह्य पद्धतीने आठ अ मंजुरी घेणाऱ्या सध्या मेहकर तालुक्यातील २३ ले-आऊट धारकांच्या ले-आऊटमधील खरेदी-विक्री बंद करण्याचे आदेश उपविभाग महसूल अधिकारी रवींद्र जोगी यांनी दिले होते.काही दिवसांत ऐकून ५५ ते ६० ले-आऊटच्या खरेदी-विक्री बंद करण्याचे आदेश झळकणार असल्याचे बोलल्या जात आहे. त्यानुसार या अगोदर मेहकर तालुक्यातील २३ ले-आऊटमधील खरेदी-विक्री बंद करण्याचे आदेश दिले आहेत. तर १३ जुलै रोजी पुन्हा चार लेआउट रद्द करण्यात आले आहेत.आणखीही किती ले-आऊटचे प्रकरण समोर येणार याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### डोणगाव येथे मोठ्या प्रमाणात अनधिकृत लेआउट

डोणगाव येथेही लेआउटचा मोठ्या प्रमाणात गोंधळ झालेला असून उपविभागीय अधिकारी लक्ष घालून येथील अनाधिकृत लेआउट रद्द करणार का डोणगाव मध्ये ही सुद्धा अनेकांची फसवणूक झाल्याची खमंग चर्चा आता समोर येत आहे. त्यामुळे डोणगावचे एन.ए. लेआउट सुद्धा रद्द होणार का.? डोणगाव येथे अनेकांनी लेआउटच्या नावाखाली गोरख धंदे चालू आहेत.सदर लेआउटची सखोल चौकशी जर झाली तर अनेकांचे पितळ उघडे पडणार आहे. डोणगाव येथील पातुरकर यांनी लेआउट मध्ये असलेला नैसर्गिक नाल्याची विक्री केली आहे. डोणगाव येथील भाग दोन मध्ये राज्य महामार्गाला लागत असलेले पातुरकर यांचे लेआउट मध्ये नैसर्गिक मोठा नाला आहे. ह्या नाल्यावरून राज्य महामार्गाचा फुलाचे सुद्धा बांधकाम झालेले आहे. मात्र, लेआउट मालकाने हा नाला आपल्या लेआउट मधून वगळून त्यामध्ये एन.ए लेआउट टाकून प्लॉट म्हणून नाल्याची सुद्धा विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आलेला आहे. त्यामुळे हे लेआउट सुद्धा तात्काळ रद्द होऊन संबंधितावर योग्य ती कारवाई होणार का असा प्रश्नही आता उपस्थित होत आहे...

## विविध वृत्त...

### बेपत्ता महिला आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या सतर्कतेमुळे नातेवाईकांच्या स्वाधीन

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** बेपत्ता महिला आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या सतर्कतेमुळे नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आली. अशी माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी दिली. प्राप्त माहितीनुसार कारखेडा येथील महिला मंदा खंडारे ४ जुलैपासून मानोरा जातो म्हणून निघून गेली होती. परंतु,दोन-तीन दिवस तिचा पत्ताच लागत नसल्यामुळे भाऊ किशोर जाधव यांनी मानोरा पोलीस स्टेशन येथे मंदा खंडारे हरविल्याचा तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलीस पाटील यांच्या व्हाट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून सदर महिला ही कानशिवनी जिल्हा अकोला येथे असल्याची माहित पडली.

पिंजर येथील आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख दिपक सदाफळे यांच्या सहकार्यामुळे सदर महिलेला पिंजर पोलीस स्टेशनला आणून मानोरा तहसीलदार संतोष यावलीकर, मानोरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार प्रविण शिंदे यांना याबाबत माहिती दिली. ठाणेदार शिंदे यांनी सदर घटनेबाबत पोलीस पाटील यांना माहिती दिली. त्यानंतर सदर महिलेला नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. यासाठी वाशीम जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत व आपत्ती व्यवस्थापन प्रमुख तथा समाजसेवक दिपक सदाफळे, मानोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रवीण शिंदे व पोलीस पाटील व्हाट्सअॅप ग्रुपचे सहकार्य मिळाले.

### शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्यावतीने नुकताच सत्कार करण्यात आला. पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे व माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालय वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने पाचवी व इयत्ता आठवी साठी पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची आयोजन दरवर्षी करण्यात येते. या परिक्षेला स्थानिक एसएमसी इंग्लिश स्कूल वाशीम येथील विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यामध्ये इयत्ता पाचवीतील मोक्षदा चांदजकर, रिधीका मोरे, आयुष सुरटकर, प्रांजल ठाणे, यांनी गुणवत्ता यादीत येऊन दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी प्राचार्य मीना उबगडे,शिक्षक अभिजीत जोशी यांना दिले आहे. यावेळी प्रा.गजानन वाघ व संस्थेचे कर्मचारी अनंत पंडितकर उपस्थित होते.

### राजू महाराज मंदिर येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**अनसिंग/प्रतिनिधी :** येथील राजू महाराज मंदिरात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच भाविकांची मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. संपूर्ण मंदिर परिसर फुलांच्या सजावटीने आणि दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाला होता. तसेच कीर्तन, गुरु पूजन, प्रवचन व आरती अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुपौर्णिमेच्या औचित्याने राजु महाराजांनी गुरुच्या महत्त्वावर आधारित प्रवचन दिले. कार्यक्रमानंतर सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गावकरी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

### आषाढ पौर्णिमा व वर्षावास प्रारंभ कार्यक्रम

**रिसोड/प्रतिनिधी :** भारतीय बौद्ध महासभा शाखेच्या वतीने आषाढ पौर्णिमा, वर्षावास प्रारंभ कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालिग्राम पठाडे होते. तर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य भास्कर गायकवाड होते. प्रथम मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तीना पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्रिशरण पंचशील घेऊन कार्यक्रमला सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविकात देविदास सोनुने यांनी तालुक्यात गावोगावी वर्षावास निमित्त विविध धम्म कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत पुढाकार घेणे प्रोत्साहित करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. तर, इंदुमतीताई तुरूकमाने यांनी धम्म ग्रंथाचे सामूहिक वाचन करुन बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला धम्म अनुयायी समाज घडवणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. प्रमिलाताई शेवाळे यांनी सुद्धा प्रत्येक विहारात धम्म ग्रंथाचे पठण करावे असे आवाहन केले. भास्कर गायकवाड यांनी मथुरा, गांधार शैली इत्यादी स्तुप, विहार मंदिर हे सगळ बुद्धाची देण आहे, गुरुपौर्णिमा याच आषाढ पौर्णिमेनिमेला प्रथम धम्म उपदेश केल्याने गुरुपौर्णिमा सुद्धा म्हणतात अशी माहिती त्यांनी दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष शालिग्राम पठाडे यांनी आषाढ पौर्णिमेचे महत्व सांगितले.कार्यक्रमाला विभागीय संघटिका संध्याताई पंडित, प्रा. उत्तम धांडे,मंदाताई धांडे, मीनाताई चव्हाण, सुजाता खरात, रमेश खैरे, भिवाजी खंडारे, अभिमन्यु पंडित यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश कवडे यांनी केले. तर,कोषाध्यक्ष माधव हिवाळे यांनी आभार मानले.

### 'टेस्ला' १५ जुलैपासून भारतीय बाजारपेठेत मुसंडी मारण्यास सज्ज, वाहन क्षेत्रावर काय होणार परिणाम?

**मुंबई/प्रतिनिधी :** टेस्लाचे सीईओ एलॉन मस्क यांची अमेरिकन कंपनी 'टेस्ला'चा आता भारतात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमेरिकेची बदललेले व्यापर धोरण, समीकरण आणि आयात शुल्काचा फटका भारतासह जगातील सर्वच देशांना बसलाय. त्यात भारतात टेस्लाचा होत असलेला प्रवेश ही फार म ोठी सकारात्मक घडामोड मानली जात आहे. येत्या मंगळवारी (१५ जुलै) रोजी मुंबईत टेस्लाच भारतातील पहिल शोरुम सुरू होत आहे. या शोरुममध्ये ग्राहकांना टेस्लाच्या दमदार इलेक्ट्रिक कार जवळून पाहता येतील. तसेच या आलिशान कारची टेस्ट ड्राईव्हही याच आठवड्यापासून ग्राहकांकरता उपलब्ध होईल. या शोरूममध्ये ग्राहकांचा अनुभव अधिक समृद्ध करण्यासाठी अनेक एआय फीचर्ससुद्धा उपलब्ध करण्यात आलेत आहेत. इंटरअॅक्टिव्ह स्क्रीन आणि डिस्प्लेच्या माध्यमातून ग्राहकांना कारची माहिती मिळेल. हे सेंटर केवळ ईव्ही कारच शोरूम नाही तर इथ ग्राहकांना टेस्लाची मॉडेल ३, मॉडेल ४, मॉडेल ए, मॉडेल आणि सायबरट्रकचीही माहिती मिळेल. याशिवाय ग्राहकांना टेस्लाची सौरऊर्जा उत्पादनही दिसतील. सोलर पॅनल, पावरवॉल, सोलर रुफ हेदेखील इथं येणाऱ्यांना पाहायला मिळतील.

### ठाणेदार अजिनाथ मोरे यांची अवैध दारू विक्री करणाऱ्या हॉटेलवर कारवाई




दैनिक आपला विदर्भ

**जानेफळ/प्रतिनिधी :** अवैध दारू विक्रेत्यावर ठाणेदार अजिनाथ मोरे यांनी कारवाई करून तब्बल १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई जानेफळ पोलीस स्टेशनच्या करून मुद्दे मागमुद्द्यावर जप्त करत आरोपी विरुद्ध ोकारवाई करण्यात आली.

प्राप्तमाहितीनुसारनायगांवदत्तापूरयेथेसपोनी अजिनाथ मोरे, देवेंद्र इंगळे,प्रफुल्ल देशमुख, माधव काळे, यांच्या पथकाला माहिती मिळाली की, आरोपी संतोष उत्तम दवंगे रा. वरवंड विविध कंपनीची दहा हजार रुपयांच्या अवैघ दारू घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सदर माहितीवरून पोलिसांनी गौरी हॉटेल वरवंड शिवर १ दुपारी सापळा रचला प्राप्त माहितीनुसार उत्तम डवंगे वय ३४ वर्षे रा. वरवंड ता. मेहकर जिल्हा बुलडाणा यांनी १२ जुलै रोजी रात्री अकरा वाजता अवैध दारु घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळेल सदर माहितीवरून पोलिसांनी सापळा रचून विविध कंपनीची दहा हजार १९५ रुपयाची दारू जप्त करून आरोपी विरुद्ध कारवाई करण्यात आली. १० हजाराचा मुद्देमाल मिळुन आला.सदर घटनेबाबत पोलीस कर्मचारी देवेंद्र नामदेव इंगळे यांनी तक्रार दाखल केली सदर तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत

### आजपासून स्काऊट गाईड शिक्षकांचे दोन दिवसीय तालुकानिहाय उद्बोधन वर्ग

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय व वाशीम जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्काऊट गाईड शिक्षकांचे दोन दिवसीय तालुकास्तरीय उद्बोधन वर्गाचे आयोजन प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी १४ व १५ जुलैपासून आयोजित करण्यात आले आहेत.

वाशीम तालुक्याचे उद्बोधन वर्ग १४ व १५ जुलै दरम्यान सौ. सुशीलाताई जाधव माध्यमिक विद्यालय सोनखास रोड वाशीम येथे, मालेगाव तालुक्याचे उद्बोधन वर्ग १७ व १८ जुलै दरम्यान ना.ना. मुंदडा विद्यालय मालेगाव येथे, रिसोड तालुक्याचे उद्बोधन वर्ग २२ ते २३ जुलै दरम्यान, शासकीय निवासी शाळा सवड येथे, मंगरूळपीर तालुक्याचे उद्बोधन वर्ग २४ व २५ जुलै दरम्यान जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय मंगरूळपीर येथे, कारंजा तालुक्याचे उद्बोधन वर्ग ५ व ६ ऑगस्ट दरम्यान विद्याभारती इंग्लिश स्कूल कारंजा येथे तर मानोरा तालुक्याचे उद्बोधन वर्ग ७ व ८ ऑगस्ट दरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रीय शाळा विठोली येथे आयोजित करण्यात आले आहेत. तालुकास्तरीय दोन दिवसीय उद्बोधन वर्गामध्ये स्काऊट गाईडचा प्रवेश व अभ्यासक्रम कृतीयुक्त पद्धतीने घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर पथ संचालन, सेवा प्रकल्प, समुदाय विकास कार्यक्रम, सर्वधर्मीय प्रार्थना सभा, खरी कमाई सेवा महोत्सव, राज्य व राष्ट्रपती पुरस्कार इत्यादी बाबत देखील मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या उद्बोधन वर्गास मार्गदर्शक म्हणून जिल्हा संघटक के.एल. पवार, श्रीमती मनीषा ढोके, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट डॉ. मुरलीधर जाधव, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड इंदिरा राणे,संध्या नेरकर, स्काऊट मास्टर विष्णू बोबडे, रमेश घुगे, जनार्धन बोरकर, सुभाष बलखंडे, मंगेश महाजन, गजानन गाठेकर, सचिन सतरकर, रामेश्वर सर्जेराव, प्रमोद राठोड, बबन आघाव,भागवत घुगे, संदीप ढोरे, गुलाब उचित, रमेश घुगे, निलेश मिसाळ आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तालुक्याच्या ठिकाणी आयोजित दोन दिवसीय उद्बोधन वर्गास संबंधीत तालुक्यातील इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व माध्यमाच्या प्रत्येक शाळेतील संबंधीत स्काऊट गाईड शिक्षकास पथक नोंदणी व उद्बोधन वर्गाच्या परिपत्रकानुसार पाठविण्यात यावे,असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाणे,माध्यमिक शिक्षणाधिकारी माध्यमिक मंगल धुपे यांनी केले आहे. अशी माहिती स्काऊट गाईड कार्यालयाचे जिल्हा संघटक के.एल.पवार यांनी केले आहे.

### जलोत्सव अभियानात नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** पावसाळ्यात मिळणारे पाणी हे निसर्गाचे अनमोल देणे असून पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी जिल्ह्यात जलोत्सव या विशेष अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानामध्ये जलसंधारणाच्या कामांचे सामूहिक स्वरूपात उत्सव साजरे करण्यात येणार असून नागरिकांचा सक्रीय सहभाग अपेक्षित आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.म्हणाल्या की,पावसाचे पाणी साठवण्यासाठी आणि जमिनीत रिचार्ज कंपोस्ट करण्यासाठी नागरिकांनी स्वयंस्फूर्तपणे प्रयत्न करावेत. हे केवळ पर्यावरण रक्षणासाठीच नाही, तर भविष्यातील पाण्याच्या सुरक्षिततेसाठीही अत्यावश्यक आहे. या अभियानांतर्गत, नागरिकांनी आपल्या घरात, परिसरात किंवा शेतीत तयार केलेल्या रेन वॉटर हार्वेस्टिंग संरचनांचे (जसे की जल तरा खड्डा, शाफ्ट, टाकी इत्यादी) २० ते ३० सेकंदांचे व्हिडीओ तयार करून सोशल मीडियावर पोस्ट करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या व्हीडीओमध्ये व्यक्तीचे नाव, गाव, आणि पावसाचे पाणी साठत किंवा रिचार्ज होत असल्याचे दृश्य स्पष्टपणे दिसणे आवश्यक आहे. व्हिडीओ सहज व स्पष्ट असावा, त्यात कोणतीही एडिटिंग आवश्यक नाही. सेल्फी मोडमध्ये किंवा दुसयाच्या सहाय्याने हा व्हिडीओ शूट करता येईल. हॅशटॅग वापरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच हे व्हीडीओ जिल्हा प्रशासन, जलशक्ती विभाग आणि राज्यस्तरीय पथकांपर्यंत देखील पोहोचवावेत. जलसंधारणाबरोबरच हा जलउत्सव देखील आहे. आपण आपल्या कामाचा अभिमानाने सहभाग घ्यावा व जिल्ह्याला जलसंधारण क्षेत्रात अग्रेसर करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी

## शेतीपूरक उद्योग निर्मिती काळाची गरज - जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.

### शेतकरी उत्पादक कंपन्या व उद्योजकांसाठी सामूहिक प्रोत्साहन योजनेची कार्यशाळा उत्साहात

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** आजच्या काळात शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत शेतीपूरक उद्योगांची निर्मिती ही काळाची गरज आहे. राज्य शासनाच्या सामूहिक प्रोत्साहन योजना, मैत्री २.० सारखी डिजिटल पोर्टल्स आणि विविध सवलती यांचा लाभ घेत उद्योजकीय दृष्टिकोनातून उत्पादनवाढीचा विचार झाला पाहिजे. जिल्हा प्रशासन म्हणून आम्ही प्रत्येक टप्प्यावर सहकार्य करण्यास तत्पर आहोत.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या आणि उद्योजकांसाठी कृषी विभाग आणि जिल्हा उद्योग केंद्र, वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. बोलत होत्या.कार्यशाळेला आरडीसी विश्वनाथ घुगे, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पूनम घुले, कृषी अधीक्षक शाह, आत्मा महाबळे, स्मार्ट नोडल ऑफिसर, एलडीएम यशवीर कुमार, नाबार्डचे शंकर कोकटवार, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी, एमआयडीसी असोसिएशनचे प्रतिनिधी, अग्रणी बँक व्यवस्थापक, नगर रचना विभाग, महसूल व कौशल्य विकास यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की,फक्त योजना समजून घेणे पुरेसे नाही. तर, त्या प्रत्यक्षात कशा अंमलात आणायच्या यासाठी एकमेकांच्या अनुभवातून शिकणेही तितकेच महत्त्वाचे आहे. या कार्यशाळेत सामूहिक प्रोत्साहन योजनेतंर्गत मिळणाया लाभांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेत शेतकरी उत्पादक कंपन्यांना आणि उद्योजकांना राज्य वस्तू व सेवा कर (एसजीएसटी), वीज दर अनुदान, आणि व्याज अनुदान यासारख्या लाभांबाबत तपशीलवार माहिती देण्यात आली. तसेच, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने सुरू केलेल्या मैत्री २.० या एक खिडकी योजनेच्या पोर्टलची सविस्तर माहिती सादर करण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी बुवनेश्वरी पुढे म्हणाल्या,शेती ही केवळ उत्पादनापुरती मर्यादित न ठेवता, तिचे मूल्यवर्धन व प्रक्रिया उद्योगाकडे वळविणे आवश्यक आहे.



शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेत शेतकरी उत्पादक कंपन्यांनी स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारी भूमिका बजावावी. जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व पातळीवर सहकार्य करण्यात येईल.अशा त्या म्हणाल्या. तसेच कार्यशाळेत जिल्हाधिकायांनी प्रश्नोत्तर सत्रात शेतकरी उत्पादक कंपन्या आणि उद्योजकांच्या विविध प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन मार्गदर्शन केले. यावेळी सीए पंकज अग्रवाल यांनी सामूहिक प्रोत्साहन योजनेची माहिती समजावून सांगितली आणि उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.